**मराठी भाषा विकास व संवर्धनासाठी आखण्यात आलेल्या योजनांना शासन मान्यता प्रदान करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय पूरक-१०११/१४५/प्र.क्र.६६/ २०११/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक - २३.१२.२०११

**प्रस्तावना :-**

मराठी भाषा विभाग हा नवीन विभाग स्थापन झाल्यानंतर मराठी भाषेसंबंधी काम करणाऱ्या भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था ही कार्यालये नवनिर्मित प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० अंतर्गत मराठी भाषा आणि साहित्य विषयक धोरणास अनुसरुन, या कार्यालयांमार्फत मराठीच्या विकास व संवर्धनासाठी काही उपक्रम राबविण्याचे शासनाकडून निश्चित करण्यात आले आहे. अशा एकूण १२ विविध उपक्रमांना शासन मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, या कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रत्येक विषयाशी संबंधित तज्ञांबरोबर चर्चा करुन तयार करण्यात आलेल्या एकत्रित प्रस्तावास अनुसरुन खालील उपक्रमांना खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**(रुपये लक्ष)**

| अ. क्र. | उपक्रमांची अंमलबजावणी करणाऱ्या विभागाचे नाव | मराठी भाषा विकास व संवर्धन विषयक उपक्रमाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १. | **महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई** | १) विश्वकोश ध्वनी चित्रफित | १०.०० |
| | | २) विश्वकोश राज स्पर्धा | ३.०० |
| | | ३) बोलका कन्याकोश | ३.०० |
| | | ४) विश्वकोश प्रचार व प्रसार | ५.०० |
| | | ५) विश्वकोश प्रश्नमंजुषा | ३५.०० |
| २. | **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई** | १) ग्रंथसंस्कृती जोपासना अभियान | ३५.०० |
| | | २) ई बुक (चारही संस्था / १५० पुस्तके) | ४.०० |
| | | ३) छोटया साहित्य संमेलनांकरीता अर्थसहाय्य | २०.०० |
| | | ४) महाराष्ट्राबाहेरील (बृहन्महाराष्ट्रातील) संस्थांना अर्थसहाय्य | २०.०० |
| ३. | **राज्य मराठी विकास संस्था, मुंबई** | १) टॉक बुक्स (३ पुस्तके) | १०.०० |
| | | २) युनिकोड टंक निर्माण करणे | ३५.०० |
| | | ३) मराठी संकेतस्थळ निर्मिती व स्पर्धा (शासकीय / निमशासकीय कार्यालये व खुला गट) | २.०० |

१. वरील उपक्रम नियोजित वेळेत व प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावेत.

२. वरील उपक्रमांबाबतच्या खर्चाचे लेखे / ताळमेळ याबाबत पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित संस्थांच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची राहील.

३. या कामावर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडडी-२, मुख्य लेखाशीर्ष २२०५ - कला व संस्कृती - ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) योजनांतर्गत" या खाली करण्यात यावा व त्यासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या **शासन निर्णय क्रमांक-विअप्र**-१०.०८/**प्र.क्र.**७०/२००८/**विनियम, दिनांक** १५.०५.२००९ **अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सुधारित वित्तीय अधिकारातील, उप विभाग - तीन अंतर्गत अनुक्रमांक** ४ - **परिच्छेद क्र.**२७(२) **मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.**

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३५३६८०३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( कि.रा.कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
५. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
६. वित्त विभाग (व्यय -१४ / विनियम / अर्थसंकल्प -३ / अर्थसंकल्प - ११), मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
८. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. भाषा - ३ (संग्रहार्थ).